# T12/AGR201/EE/20160301

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) पाण्याचे महत्त्व विशद करून मृदासंबंधीत क्रियात कोणत्या बाबींचा समावेश होतो. 5

ब) अग्निजन्य खडक म्हणजे काय ? या खडकाचे प्रकार उदाहरणांसहित लिहा. 5

क) माती तयार होण्यासाठी महत्त्वाच्या क्रिया कोणत्या ? यांचे सविस्तर वर्णन करा. 5

ड) मातीच्या कणांच्या प्रमाणानुसार जमिनीचे विविध प्रकारचे पोत काढण्याच्या त्रिकोणी पद्धतीचे वर्णन करा व जमिनीच्या पोतानुसार वर्गीकरण करा ? 5

इ) कार्बन नायट्रोजन गुणोत्तर व त्याचा जमिनीवर होणारा परिणाम विशद करा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) क्षारयुक्त जमिन म्हणजे काय ते सांगून क्षारयुक्त जमिनीची सुधारणा कशी करावी ते लिहा. 5

ब) क्षारयुक्त विम्ल जमिनीचे गुणधर्म लिहा. 5

क) जमिनीची धूप म्हणजे काय ? जमिनीच्या धूपीचे प्रकार सांगून त्याविषयी माहिती लिहा. 5

ड) पाणलोट क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. 5

इ) वनस्पतीमधील मुख्य अन्नद्रव्याचे सर्वसाधारण कार्य कोणते ? वनस्पतीमध्ये गंधकाची कार्ये कोणती आहेत ? 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) सुक्ष्म अन्नद्रव्याच्या अधिक प्रमाणामुळे वनस्पतीवर होणारे अनिष्ट परिणाम कोणते ? 5

ब) अन्नद्रव्याची सिमांत मूल्यपातळी (क्रिटिकल लेव्हल) म्हणजे काय ? याचे सविस्तर वर्णन तक्ता देवून करा. 5

क) वनस्पतीच्या पृथक्करणाचे प्रकार सांगून कोणत्याही एकाची माहिती लिहा. 5

ड) पाणी तपासणीनंतर पाण्याची प्रतवारी कशी करतात ? 5

इ) हिरवळीच्या खतांचे उपयोग, हिरवळीच्या पिकांचे गुणधर्म कोणते ? 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) ॲझोला व स्फुरद विरघळविणारे जीवाणू याबद्दल थोडक्यात माहिती लिहा. 5

ब) पालाशयुक्त खतांचे वर्गीकरण लिहा. या खतांचे उदाहरणे लिहा. 5

क) एकात्मिक खत व्यवस्थापन म्हणजे काय ? याचे घटक थोडक्यात विशद करा. 5

ड) सुपर फॉस्फेट दाणेदार स्वरूपात बनविणे आवश्यक का ते लिहा. 5

इ) रासायनिक खताच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी खत विक्रेत्याच्या दुकानाची तपासणी करतांना कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्यात. 5

✦✦✦✦✦✦✦